गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS


RNI NO. MAHMAR/2023/84162

● वर्ष १ ले ● अंक ८१ वा ● रविवार ०६ ऑगस्ट २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 81 | Date : 06/08/2023 | blow : Sunday | Page 4 | Price 4

## ‘मला चंद्राचं गुरुत्वाकर्षण जाणवतंय’

### चंद्राच्या कक्षेत प्रवेश केल्यानंतर चांद्रयान-३ चा इस्रोला पहिला संदेश




नवी दिल्ली : इस्रोच्या महत्त्वाकांक्षी चंद्रमोहिमेबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. चांद्रयान-३ ने महत्त्वाचा टप्पा पूर्ण केला आहे. चांद्रयान-३ ने यशस्वीरित्या चंद्राच्या कक्षेत प्रवेश केला आहे. इस्रोने ट्विट करून याबाबत माहिती दिली आहे. ISRO ने माहिती दिली की, चांद्रयान-३ चे पुढील ऑपरेशन ६ ऑगस्ट २०२३ रोजी सुमारे २३.०० वाजता पार पडणार आहे. १४ जुलै रोजी चांद्रयान-३ लॉंच करण्यात आले होते. तेव्हापासून या यानाने चंद्राच्या अंतराच्या दोन तृतीयांश अंतर पूर्ण केले आहे. चांद्रयान-३ चंद्राच्या कक्षेत पोहोचताच पहिला संदेश पाठवला आहे.

चांद्रयान-३ चंद्राच्या कक्षेत पोहोचताच इस्रोसाठी खास संदेश पाठवला. हा संदेश असा आहे, MOX, ISTR-C, this is Chandrayaan-3. I am feeling lunar gravity. याचा संदेशामध्ये म्हटलं आहे की, मिशन ऑपरेशन्स कॉम्प्लेक्स (MOX), ISTR-C, बंगळुरू. हे चांद्रयान-३ आहे. मला चंद्र गुरुत्वाकर्षण जाणवत आहे.

इस्रोने ट्वीटमध्ये म्हटलं की, चांद्रयान-३ ने चंद्राच्या कक्षेत यशस्वीरित्या प्रवेश केला आहे. पुढील ऑर्बिट रिडक्शन ऑपरेशन रविवारी रात्री ११ वाजता केलं जाईल. इस्रोच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १०० किमीच्या वर्तुळाकार कक्षेत असलेल्या उपग्रहाला चंद्राच्या जवळ आणण्यासाठी आणखी चार ऑर्बिट रिडक्शन ऑपरेशन केले जाणार आहेत.

चांद्रयान-३ चं १४ जुलै रोजी श्रीहरीकोटा येथील अंतराळ केंद्रातून यशस्वीरत्या प्रक्षेपण पार पडलं. १ ऑगस्ट रोजी चांद्रयानाला पृथ्वीच्या कक्षेतून चंद्राच्या कक्षेत जाण्यासाठी प्रवास सुरु केला. यानंतर आता चांद्रयान-३ यशस्वीरित्या चंद्राच्या गुरुत्वाकर्षण कक्षेत पोहोचलं आहे.

चांद्रयान-३ ला ट्रान्सलुनर ऑर्बिट'मध्ये ठेवण्यात आलं आहे. इस्रोने यापूर्वी दिलेल्या माहितीनुसार, चांद्रयान-३ २३ ऑगस्ट रोजी चांद्रयान-३ चे चंद्रावर उतरेल. चांद्रयान-३ चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर 'सॉफ्ट लँडिंग' करण्याचा प्रयत्न करेल.

## आमदारकी, खासदारकी लढवण्यासाठी वय २५ वरुन १८ करा, आयोगाचा मात्र विरोध



### संसदीय समितीच्या शिफारशीने नव्या मुद्द्याची चर्चा,

नवी दिल्ली : आमदार खासदार व्हायचंय तर २५ वर्षांची वयोमर्यादा कशाला..ती १८ वर्षे करा...अशी शिफारस संसदीय समितीने केली आहे. अर्थात निवडणूक आयोगाने त्याला विरोध केला आहे. पण संसदीय समितीची शिफारस असल्याने या मुद्द्यावर चर्चेला मात्र सुरुवात होऊ शकते. संसदेच्या कार्मिक, सार्वजनिक तक्रार निवारण, कायदा समितीने ही शिफारस केली आहे. भाजपचे सुशील कुमार मोदी हे या समितीचे अध्यक्ष आहेत. मतदानाचा अधिकार १८ वर्षे पूर्ण झाली की प्राप्त होतो. पण विधानसभा, लोकसभा लढवायची असेल तर त्यासाठी वयाची किमान २५ वर्षे पूर्ण असावी लागतात. राज्यसभेसाठी ही वयोमर्यादा ३० वर्षांची आहे. पण जर अधिकाधिक तरुणांना निर्णय प्रक्रियेत सामील करायचं असेल तर १८ वर्षे पूर्ण झाली की ही संधी उपलब्ध असली पाहिजे अशी शिफारस संसदीय समितीने केली आहे. त्यासाठी काही इतर देशांची उदाहरणं पण दिली आहेत.

हे वय कमी करण्यासाठी संसदीय समितीने नेमकी काय कारणं दिली आहेत ते पाहूया.


१८ वर्षे झाली की आमदार, खासदार होऊ द्या?

आमदार, खासदारकीची निवडणूक लढवण्यासाठी वय २५ वरुन १८ केलं तर त्यामुळे तरुणांना लोकशाहीच्या निर्णय प्रक्रियेत सहभागाची अधिक संधी मिळेल. अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलियासारख्या अनेक देशांची उदाहरणं त्यासाठी समितीनं दिली आहेत.

जगात सध्या अनेक सामाजिक चळवळी कमी वयाच्या मुलांनी सुरु केल्या आहेत. ग्रेटा थनबर्ग हिनं उभी केलेली फ्रायडेस फॉर फ्युचर ही पर्यावरणविषयक चळवळ असो की मार्च फॉर अवर लाईव्हस...ही वाढत्या गन कल्चरविरोधातली चळवळ याची उदाहरणं आहेत.

त्यामुळे आपल्याकडेही युवाशक्तीला वाव देण्यासाठी ही संधी असली पाहिजे असं संसदीय समितीचं म्हणणं आहे. । पान २ वर

## भाषांनी देशाला एकसंध ठेवण्याचे काम केलं, स्थानिक भाषांना सन्मान दिला तरच राजभाषेचा स्वीकार होईल : अमित शाह



नवी दिल्ली : सर्व भाषांनी आपला देश जोडण्याचे काम केलं आहे. भाषांनी देश एकसंध ठेवल्याचे वक्तव्य केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलं. गुलामगिरीच्या काळातही भारतीय भाषा आणि त्यांचे शब्दकोश अबाधित राहिले, ही मोठी उपलब्धी असल्याचे ते म्हणाले. मंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत संसदेच्या राजभाषा समितीची ३८ वी बैठक संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रपतींना सादर केल्या जाणाऱ्या संसदेच्या राजभाषा समितीच्या अहवालाच्या बाराव्या खंडालाही मान्यता देण्यात आली आहे.

हिंदीची स्थानिक भाषांशी स्पर्धा नाही. सर्व भारतीय भाषांना प्रोत्साहन देऊनच राष्ट्र सक्षम होईल असं वक्तव्यही अमित शाह यांनी केलं. सर्व भाषांनी आपला देश जोडण्याचे केले काम केलं. गुलामगिरीच्या काळातही भारतीय भाषा आणि त्यांचे शब्दकोश अबाधित राहिल्याचे शाह म्हणाले. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशासमोर 'पंचप्रण' ठेवले आहेत. त्यापैकी दोन प्रण (संकल्प) आहेत. एक वारशाचा आदर करणे आणि दुसरे गुलामगिरीची चिन्हे पुसून टाकणे, असे शाह म्हणाले. या दोन प्रणांच्या १०० टक्के अंमलबजावणीसाठी सर्व भारतीय भाषा आणि राजभाषा यांनी त्यांची ताकद दाखवायला हवी असेही मंत्री शाह यांनी । पान २ वर

## ग्रंथालयांचा विकास समाज आणि संस्कृतीशी निगडित : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू




नवी दिल्ली : ग्रंथालयांचा विकास हा समाज आणि संस्कृतीच्या विकासाशी निगडित आहे. सभ्यता आणि संस्कृतीच्या प्रगतीचेही ते मापदंड आहेत. यासाठी ग्रंथालयांचे आधुनिकिकरण आणि डिजिटलायझशनला गती देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी ग्रंथालय महोत्सव २०२३ च्या उद्घाटनाप्रसंगी आज केले.

राजधानीतील प्रगती मैदान येथे हॉल क्रमांक ५ येथे केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयातर्फे २२ग्रंथालय महोत्सव २०२३२२ चे आयोजन करण्यात आले आहे. कायदा आणि न्याय मंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि सांस्कृतिक व संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुनराम मेघवाल, केंद्रीय सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री मीनाक्षी लेखी, सांस्कृतिक मंत्रालयाचे सचिव गोविंद मोहन, साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. अनामिका उपस्थित होत्या. तसेच सर्व राज्यांचे शासकीय ग्रंथालय प्रतिनिधींसमवेत महाराष्ट्र शासनाचे ग्रंथालय संचालक डॉ. दत्तात्रय क्षीरसागर यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते.ग्रंथालये हस्तलिखितांचे जतन करतात तसेच इतिहास आणि भविष्यातील दरीही सांधतात. । पान २ वर



### दिल्ली-एनसीआरमध्ये भूकंपाचे धक्के; ५.८ तीव्रतेचा भूकंप

दिल्ली : दिल्ली-एनसीआरमध्ये शनिवारी (५ ऑगस्ट) संध्याकाळी उशिरा भूकंपाचे धक्के जाणवले. भूकंपाची तीव्रता ५.८ इतकी होती. रात्री उशिरा ९.३४ वाजता हे धक्के जाणवले. जम्मू-काश्मीरमधील गुलमर्ग येथेही भूकंपाचे धक्के जाणवले.अफगाणिस्तानच्या हिंदुकुशमध्ये भूकंपाचा केंद्रबिंदू होता. आतापर्यंत जीवित किंवा मालमत्तेच्या नुकसानीची कोणतीही माहिती मिळालेली नाही. ५.८ रिश्टर स्केलचा भूकंप हा मध्यम तीव्रतेचा भूकंप मानला जातो. मात्र, भूकंपाचे धक्के जाणवल्यानंतर नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण पाहायला मिळाले. मिळालेल्या माहितीनुसार, भूकंपाचा केंद्रबिंदू अफगाणिस्तानच्या हिंदुकुशमध्ये होता. त्यामुळे जम्मू-काश्मीरमध्येही त्याचे धक्के जाणवले आहेत. केंद्र हिंदुकुशमध्ये असल्यामुळे पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि भारत या तिन्ही देशांना याचे धक्के जाणवले आहेत. जम्मू-काश्मीरमध्ये अनेकदा भूकंपाचे धक्के बसले आहेत, तर दिल्ली-एनसीआरही भूकंपाच्या धक्क्यामुळे हादरली.

## टोमॅटोनंतर बटाटा, कांदेही महागेल

नवी दिल्ली : गेल्या चार महिन्यात टोमॅटो, बटाटे, कांदे यांसह इतर मसाले मोठ्या प्रमाणावर महागल्याने सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले आहे. इकॉनॉमिक आऊटलूकने यासंदर्भात सविस्तर आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. यानुसार गेल्या चार महिन्यात टोमॅटोचे दर जवळपास सहापट वाढले आहेत. तर बटाटे आणि कांद्याच्या दरात अनुक्रमे २८ आणि १८ टक्के इतकी वाढ झालेली आहे. ३१ मार्च २०२३ला टोमॅटोचा दर २३.६० रुपये किलो इतका होता. हा दर ३ ऑगस्ट २०२३ला १४०.१० रुपये प्रतिकिलो इतका आहे. ही वाढ जवळपास ४९४ टक्के किंवा सहपट जास्त आहे, असे म्हटले आहे. तर बटाटाच्या दरात २८ टक्के आणि कांद्याच्या दरात १८ टक्के इतकी वाढ झाली आहे. याशिवाय तूर डाळ, गूळ, उडीद डाळ, तांदूळ, मूग डाळ, साखर, दूध यांच्या दरात २ ते १८ टक्के इतकी दरवाढ झालेली आहे. महत्त्वाचे मसाले असलेले आले १०७ टक्के, लसूण ७६.३० टक्के, हळद ६७.१० टक्क्यांनी महागली आहे. कोथिंबिरीचा दरही ४.४ टक्क्यांनी वाढला आहे, असे या संस्थेने म्हटले आहे. फक्त खाद्यतेलांच्या दरात घसरण झाली असल्याचे चित्र आहे. सूर्यफूल तेल १४ टक्क्यांनी स्वस्त झाले आहे. तर मोहरीचे तेल, सोयातेल, पामतेल यांच्या किमतीही घसरल्या आहेत.

## अग्निवीरांच्या पहिल्या तुकडीची पासिंग आऊट परेड, एकूण ७५६ अग्निवीरांनी घेतली शपथ

नवी दिल्ली : अग्निवीरांच्या पहिल्या तुकडीची पासिंग आऊट परेड शनिवारी, ५ ऑगस्ट रोजी जाट रेजिमेंटल सेंटर बरेलीच्या बक्षी परेड मैदानावर पार पडली. शीख रेजिमेंटच्या अग्निवीरांनी झारखंडमधील रेजिमेंटल सेंटरमध्ये प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर पासिंग आऊट परेडचे आयोजन केले होते. ३१ आठवड्यांच्या अथक परिश्रमानंतर अग्निवीरांनी आपल्या देशाचं रक्षण करण्याची शपथ घेतली आणि ते सैन्यात सामील झाले. अग्निवीरांच्या कुटुंबीयांनीही यावेळी विशेष सहभाग घेतला. पासिंग आऊट बँड परेड दरम्यान मार्च करताना शीख रेजिमेंटच्या अग्निवीरांनी पंजाबीमध्ये 'तिरंगा सादी जान' गाणं गायलं. याशिवाय परेडदरम्यान मिरवणूक काढताना पासिंग आऊट बँचने 'चल जवाना दौर' हे गाणंही गायलं. एएनआयने शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये उत्तीर्ण झालेल्या अग्निवीरांनी एकसुरात मोर्चा मार्च करताना अनेक गाणी गायली. यामध्ये 'चल जवाना दौर, देश नु तेरी लोरह, हर मैदान फतेह कर, मुश्किल दे विचार दात के खर, शीख रेजिमेंट दी शान, तिरंगा सादी जान' यांचा समावेश आहे.

## ‘शासन आपल्या दारी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रत्येक विभागाने सूक्ष्म नियोजन करावे : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

### शासन आपल्या दारी हा उपक्रम पंढरपूर येथे २६ ऑगस्ट रोजी घेण्याचे येणार



पंढरपूर/प्रतिनिधी: विविध शासकीय योजनांचा जनतेला थेट लाभ देण्यासाठी शासन आपल्या दारी हा लोकाभिमुख उपक्रम राज्यात राबविण्यात येत आहे. शासन आपल्या दारी अभियानातर्गत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थित २६ ऑगस्ट रोजी पंढरपूर येथे जिल्हास्तरीय कार्यक्रम नियोजित असून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रत्येक विभागाने समन्वयाने सुक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या.

शासकीय विश्रामगृह पंढरपूर येथे शासन आपल्या दारी उपक्रमाचा आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, प्रांताधिकारी गजानन गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, अधिक्षक अभियंता संजय माळी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधन शेळकंदे, एसटी महामंडळाचे विभाग नियंत्रक विनोदकुमार भालेराव, तहसिलदार सुशिल बेल्हेकर, नगरपालिका प्रशासन अधिकारी अशिष लोकरे, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, मुख्याधिकारी अरविंद माळी, कार्यकारी अभियंता श्री निंबकर, मंदीर समिती व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांच्यासह संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद म्हणाले, राज्यातील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी 'शासन आपल्या दारी' उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा जिल्हास्तरीय कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या तालुकानिहाय महसूल, कृषी, कामगार, पंचायत समिती, आरोग्य विभाग आदी विभागांच्या लाभार्थ्यांची योजनेच्या नावासह माहिती तयार करावी. अधिकाधिक लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनेचा लाभ देण्याबाबत नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

या कार्यक्रमास सुमारे ४० हजारापेक्षा अधिक नागरिक उपस्थित राहणार असल्याने एकाही लाभार्थ्यांची गैरसोय होणार नाही या अनुषंगाने आवश्यक नियोजन करावे असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगून वाहतुक व्यवस्था, स्वच्छ पिण्याचे पाणी, वाहनतळ, आरोग्य सुविधा, लाभार्थ्यांची बैठक व्यवस्था, लाभार्थ्यांना लाभाचे मान्यवरांच्या हस्ते वाटपाचे काटेकोर नियोजन करण्याचे त्यांनी सुचित केले. सर्व विभागांनी आपल्यावर सोपविलेली कामाची जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी अशा सूचनाही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी उपक्रमाची व प्रत्येक विभागाने करावयाच्या कार्यवाहीची सविस्तर माहिती दिली.तत्पुर्वी जिल्हाधिकारी कुमार यांनी शासन आपल्या दारी कार्यक्रमाच्या अनुषंगाने ६५ एकर, भीमा बसस्थानक तसेच चंद्रभागा बसस्थानक येथील जागेची पाहणी करुन संबधीत अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

## * सुविचार *

आधी माणूस वाचा, मग पुस्तक वाचा.

## संपादकीय

### भूतकाळातील दिरंगाई..

लोकांच्या मनात माळीण, तळिये आणि अशाच अनेक दुर्दैवी घटनांच्या वेदनादायी आठवणी जाग्या झाल्या. इर्शाळवाडी घटना नेमकी का घडली? मृत्यूचा आकडा किती? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे अजून त्या लोकांना मिळायची आहेत. ती मिळतील का, याची चिंता लोकांना सतावत असावी. कारण इर्शाळवाडी डोंगराच्या उदरात गडप झाली आणि माध्यमांनी भूतकाळात घडलेल्या तशाच काही घटनांचा आढावा घेतला. अशा घटनांच्या बाबतीत सरकारचे घोडे नेहमीच वरातीमागून धावते हे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील मान्य केले. या घटनेमुळे राज्यातील विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे पालक अस्वस्थ झाले असतील तर नवल नाही. राज्यातील अनेक शाळांच्या इमारती पडिक आणि कधीही कोसळतील अशा अवस्थेत उभ्या आहेत. त्यांचे वृत्त अधूनमधून माध्यमात प्रसिध्द होत असते. संरक्षण भिंती जमीनदोस्त होतात. विद्यार्थ्यांना बसायला जागा नसते. दोन-तीन इयत्तांचे वर्ग एकाच खोलीत भरतात. अशा शाळांमध्ये मुलांना पाठवताना पालक नक्कीच अस्वस्थ होत सतील.पण त्यांचा नाईलाज होत असेल. इमारतीच्या जीर्ण अवस्थेमुळे पाल्याला शाळेत पाठवले नाही तर शिक्षणाचे नुकसान आणि पाठवले तर जीवाची भीती, अशा कात्रीत पालक सापडत असावेत. अनेक सरकारी शिक्षक चौकटीबाहेर जाऊन काम करतात. विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण मिळावे म्हणून अनेक प्रयोग करतात. अशाही परिस्थितीत मुलांना शाळेत पाठवण्याची, विद्यार्थ्यांची शिकण्याची आणि शिक्षकांमधील शिकवण्याची वृत्ती टिकून आहे हे त्यांनी शासनावर केलेले उपकारच नाहीत का? शाळा इमारतींच्या बांधकामांचे परीक्षण करण्याचे आदेश वेळोवेळी दिले जातात. पण त्याचे पुढे काय होते? असे अनेक आदेश फक्त कागदावरच अस्तित्वात असतात हेच वास्तव आहे. इर्शाळवाडीसारखी एखादी दुर्घटना घडली की झोपी गेलेले प्रशासन आणि समाजालाही तात्पुरती खडबडून जाग आल्यासारखी वाटते. आता परिस्थिती खरेच बदलेल अशा आशा माणसांना वाटू लागतात. पण थोडा काळ गेला की पुन्हा सगळेच सोयीस्कररीत्या झोपेचे पांघरूण ओढत असावेत का? याविषयीची माहिती 'यूडायस'वर भरलेली असते असे सांगितले जाते. यूडायस हे केंद्र सरकारने विकसित केलेले एक पोर्टल आहे. त्याचा आढावा घेतला जातो का? दुर्घटना घडल्यानंतरच शासनाला का जाग येते? त्यामुळे भूतकाळातील दिरंगाईचे परिमार्जन होऊ शकेल.

# मनाला अस्वस्थ करणारी जखम म्हणजेच प्रेम उठाव...!

## पुस्तक परीक्षण : ॲड.प्रज्ञेश चैतन्य सोनावणे, ठाणे शहर

माझे परममित्र नवनाथ आनंदा रणखांबे अत्यंत हुशार प्रामाणिक निस्वार्थपणे जगणारे व्यक्ती आहे.

अनेक वर्षांपासून त्यांची व माझी ओळख आहे साहित्य क्षेत्रात असल्याने आमच्या दोघांचे विचार आचार चांगलेच गाजतं.

३० डिसेंबर २०१८ रोजी कवी नवनाथ यांचा पहिला मराठी भाषेतील कविता संग्रह जीवन संघर्ष प्रकाशन सोहळ्याला, मी आवर्जून उपस्थित होतो. तिथून खऱ्या अर्थाने कवी नवनाथ यांचे साहित्य क्षेत्रामध्ये जीवन संघर्ष यात्रेला सुरुवात झाली. माझ्या मते जीवन संघर्ष ह्या कविता संग्रह अडीचशे लोकांनी परीक्षण / समीक्षा केलेला हा मराठी साहित्य क्षेत्रातील कवी नवनाथची मोठी गरुड झेप म्हणावी लागेल.



२९ मे २०२२ रोजी कवी नवनाथ रणखांबे यांचा लग्नाचा वाढदिवस होता आणि त्याच अनुषंगाने कवी नवनाथ रणखांबे यांनी दुसरा मराठी भाषेतील कविता संग्रह प्रकाशित केला प्रेम उठाव असे नाव आहे. मुळात प्रेम आणि उठाव हे दोन्ही शब्द परस्पर विरोधी आहेत प्रेम म्हणजे आपण एखाद्यावर दया माया करून सहानुभूती करतो अर्थात समोरच्या व्यक्तीला सुखात ठेवण्याचा प्रयत्न आपला हातून होत असतो.

कधी आईची माया तर कधी बहिणीची माया इत्यादी हे प्रेमाच्या छायात येतात.

प्रेम म्हणजे त्याची विस्तृत मांडणी केली तर त्यामध्ये प्रे- म्हणजे प्रेरणा

म- म्हणजे मरण

चांगल्या प्रेरणांना कधीच मरण नसतं. असे आपल्याला प्रेमाची व्याख्या करता येते.

परंतु उठाव याबद्दल किंवा या शब्दाबद्दल लिहायचे झाले, तर मात्र व्यवस्थेच्या विरुद्ध बंड करून, अन्याया अत्याचाराविरुद्ध उठाव करून, आपल्या न्याय हक्कांसाठी लढणे, दबलेल्या शोषित पीडित वंचित वर्गाला इतर समूहाबरोबर उभे करणे म्हणजे उठाव आहे.

कवी नवनाथ यांचा प्रेम उठाव कथासंग्रह वाचल्यावर त्याची अनुभूती येते.

कवी नवनाथ आपली भावना व्यक्त करताना लिहितात, दुःख माझे अंतरीचे रोखताना, वेदनेने रोज केले मात होती. कवीने स्वतःचे दुःख अंतर्मनात आहे असे सांगितले आणि त्याला होणाऱ्या वेदना त्या दुःखावर मात कशाप्रकारे करत आहेत हे सुद्धा आपल्याला कवितेच्या माध्यमातून सांगत आहे.

कवी नवनाथ एवढ्यावरच न थांबता, त्यांना अस्वस्थ करणारा उठाव करायचा आहे. त्यामुळे ते लिहितात का अस्वस्थ करते हे निखाऱ्यांचे जग?

का फुटत चाललाय व्यक्त अव्यक्त भावनांचा नाजूक बांध.

कवी नवनाथ यांना इथे त्यांचा संघर्ष त्यांना अस्वस्थ करत आहे, पुढे त्यांचा भावनांचा नाजूक बांध सुद्धा व्यक्त अव्यक्तपणे फुटत चालला आहे. त्यामुळे त्यांना त्यांच्या आतल्या आवाजाच्या हाका ऐकू येत आहेत आणि त्यांना प्रेम उठाव करण्यासाठी प्रवृत्त करत आहेत.

अन्याय करणाऱ्या पेक्षा अन्याय निमूटपणे सहन करणारा दोषी असतो असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते त्यांच्याच मार्गावर कवी नवनाथ जात असताना समतेसाठी उठाव करतात.

कवी नवनाथ सांगतात, इथल्या खेड्यापाड्यातल्या गावगाड्यातल्या,

इथल्या सृष्टी मधल्या चराचरामधल्या व्यवस्थेच्या विरुद्ध लढण्यासाठी हाक देतात.

प्रकाशदात्या माणसांच्या अंधाराला संपून टाक सृष्टीमध्ये निसर्गात माणसांना समतेचे तत्व आण.! किती मोठी जबाबदारी कवी नवनाथ यांनी समाजाला लेखणीच्या माध्यमातून सांगून एक प्रकारे आपल्याला आवाहन करताना दिसतात.

प्रेम उठाव कविता संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे आपल्याला वेगवेगळ्या अंगाने पाहता येईल. कवी नवनाथ कधी आग होऊन, त्याला जखम लागलेली असताना तो मिलनाने बेधुंद पडतो, तर कधी अजिंक्य रणसम्राट दिसतो, हळुवारपणे हृदयाचे नातं, जगाशी जोडताना दिसतो.

कवी नवनाथ प्रेम उठाव मध्ये मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या खुणा लिहिताना मात्र संवेदनशील होताना दिसतो, शहराकडे चला, काळोखाला पेटवत तुम्ही प्रगती करा.

अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले आहे, शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हे तत्त्व सुद्धा आपल्या कवितेच्या माध्यमातून सांगताना कवी नवनाथ विसरलेले नाही.

कवी नवनाथ यांनी प्रेम उठाव कविता संग्रह अत्यंत संवेदनशीलपणे आणि ताकदीचे लिखाण करून उत्तमरित्या कवितेची मांडणी केलेली दिसून येते.

त्यात ज्येष्ठ साहित्यिक प्राध्यापक डॉ. विठ्ठल शिंदे सह अनेक नामवंत साहित्यिक मान्यवरांनी सुद्धा कवी नवनाथ यांच्या कवितेची प्रशंसा केलेली दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची मशाल घेऊन कवी नवनाथ प्रेम उठाव करतोय ही बाब मराठी साहित्यातील पहिली घटना असावी. त्यांनी लिहिलेल्या कवितासंग्रह प्रेम उठाव येणाऱ्या पिढीला निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे यात शंकाच नाही. कवी नवनाथ यांचे शब्द माझे मला माझ्या मनाला खूपच भावले हुंदक्याच्या गाण्याने शब्द माझे गोठले वितळून अश्रूने ते डोळ्यातून वाहिले.

प्रेम उठाव कवितासंग्रह वाचत असताना प्रत्येक कविता खूप काही बोलून जातात, त्याचबरोबर ते नुसते बोलत नाहीत तर वेदना, दुःख, यातना सोसून जगण्याची वाट दाखवत पुढे जातात.

नवनाथ प्रेम उठाव कवितासंग्रहाच्या माध्यमातून लोकांपर्यंत लोकांच्या हृदयाला स्पर्श करणारा कविता संग्रह आहे. मनाला अस्वस्थ करणारी जखम म्हणजेच प्रेम उठाव कविता संग्रह आहे, प्रत्येकाने आवर्जून तो वाचला पाहिजे असं माझं या ठिकाणी आवाहन आहे. प्रेम उठाव कविता संग्रहाला माझ्याकडून खूप शुभेच्छा तसेच कवी नवनाथ रणखांबे यांना पुढील साहित्य क्षेत्रातील वाटचालीस अनेक अभिष्टचिंतन.

ॲड. प्रज्ञेश चैतन्य सोनावणे, ठाणे शहर

( परीक्षक हे फुले शाहू आंबेडकरी साहित्याचे अभ्यासक तथा भाष्यकार आहे)

पुस्तक :- प्रेम उठाव
किंमत :- ९०/-
कवी :- नवनाथ रणखांबे
प्रकाशन शारदा प्रकाशन ठाणे

# अधिवेशन संपताच आज सुट्टीच्या दिवशी मंत्रालयात उपस्थित राहून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून नागरिकांच्या पत्रांवर कार्यवाही

मुंबई : विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन शुक्रवारी रात्री उशीरा संस्थगित झाल्यानंतर, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज (दि.५ऑगस्ट) सुट्टीच्या दिवशी सकाळी आठ वाजता मंत्रालयात येऊन अधिवेशन काळात नागरिकांकडून प्राप्त झालेल्या पत्रांचा आढावा घेतला तसेच कार्यवाहीबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. तत्पूर्वी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासोबत बैठक घेऊन चर्चा केली.उपमुख्यमंत्री अजित पवार हे तत्पर निर्णयांसाठी, त्यांच्याकडील नस्त्यांचा तसेच कामांचा वेळेवर निपटारा करण्यासाठी ओळखले जातात. विधिमंडळ अधिवेशन काळात उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भेटण्यासाठी, निवेदने व पत्रे देण्यासाठी नागरिकांची गर्दी होत होती. परंतु विधिमंडळ कामकाजातील व्यस्ततेमुळे सर्वच पत्रे-निवेदनांवर कार्यवाही होऊ शकली नव्हती. अधिवेशन संपताच, दुसऱ्या दिवशी सकाळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयातील त्यांच्या कार्यालयात येऊन सर्व प्रलंबित कामे निकाली काढली. या निमित्ताने त्यांच्या लोकाभिमुख कारभाराचा तसेच प्रशासकीय तत्परतेचा प्रत्यय पुन्हा एकदा आला.



पान १ वरुन

### आमदारकी, खासदारकी ..

अर्थात निवडणूक आयोगानं मात्र या शिफारशीला विरोध केलाय. इतक्या कमी वयात या मुलांना संसदीय विषयांचं भान नसेल, ती जबाबदारी ते समर्थपणे पाडू शकणार नाहीत अशी भूमिका यावर निवडणूक आयोगाने घेतली आहे. आपल्या सध्याच्या लोकसभेतले ४७ टक्के खासदार हे ५५ वर्षांपेक्षा अधिक वयाचे आहेत. भारतीयांचं सरासरी वयोमान २८ वर्षे असताना २५ ते ३० या वयोगटातले खासदार मात्र अगदी दोन टक्क्यांच्या आसपास आहेत. त्यामुळे हे चित्र विरोधाभासाचंच आहे. संसदीय समितीच्या शिफारशीने तूर्तास हा मुद्दा चर्चेत आणला आहे. निवडणूक आयोग सध्या याचा विरोध करत असलं तरी भविष्यात याबाबत जनमत काय तयार होतं हे पाहणं महत्वाचं असेल.

### भाषांनी देशाला एकसंध ठेवण्याचे ..

यावेळी सांगितलं.

भाषेचा आदर केल्याशिवाय वारशाचा आदर अपूर्ण आहे. स्थानिक भाषांना सन्मान दिला तरच राजभाषेचा स्वीकार होईल, असेही अमित शाह म्हणाले. हिंदी भाषेची स्थानिक भाषांशी स्पर्धा नाही. सर्व भारतीय भाषांना प्रोत्साहन देऊनच राष्ट्र सशक्त होईल, असे अमित शाह यांनी सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १० भाषांमध्ये अभियांत्रिकी आणि वैद्यकीय अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. लवकरच हे अभ्यासक्रम सर्व भारतीय भाषांमध्ये उपलब्ध होतील आणि तो क्षण स्थानिक भाषा आणि राजभाषेच्या उदयाची नांदी ठरेल असेही शाह म्हणाले. पंतप्रधान मोदींनी संसदेत एकही भाषण इंग्रजीत केले नाही. सरकारचे मंत्री देखील भारतीय भाषांमध्ये भाषण देण्याचा प्रयत्न करतात. यामुळं विविध भाषा जोडण्याच्या चळवळीला खूप चालना मिळते, असे शाह यांनी सांगितलं.

गुलामगिरीच्या कालखंडानंतरही भारतीय भाषा आणि त्यांचे शब्दकोश अबाधित राहिले, ही मोठी उपलब्धी आहे. भाषांनी देशाला एकसंध ठेवण्याचे काम केल्याचे शाह यांनी सांगितलं. दरम्यान, या बैठकीला राजभाषा संसदीय समितीचे उपाध्यक्ष भर्तृहरी महताब, केंद्रीय गृह राज्यमंत्री अजय कुमार मिश्रा आणि निशीथ प्रामाणिक आणि समितीचे सदस्य या बैठकीत उपस्थित होते.

### ग्रंथालयांचा विकास समाज आणि ..

ग्रंथालयांच्या विकासाला प्राधान्य देऊन ग्रंथालये हा विकासाप्रति मानवकेंद्री दृष्टिकोनाचा अत्यावश्यक भाग म्हणून तसेच ग्रंथालयांच्या विकासाला आणि डिजिटलायझेशनला गती देण्यासाठी केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाने ग्रंथालय महोत्सव २०२३ चे दोन दिवसीय आयोजन केले आहे.

राष्ट्रपती श्रीमती मुर्मू म्हणाल्या की, ग्रंथालये ही सामाजिक संवादाची, अभ्यासाची आणि चिंतनाची केंद्रे बनली पाहिजेत. ग्रंथालये एखाद्या देशाच्या किंवा समाजाच्या सामूहिक चेतनेचे आणि बुद्धीचे प्रतीक मानले गेले आहेत. प्राचीन आणि मध्ययुगीन काळात अनेक देशांतील लोकांनी भारतातून पुस्तके नेऊन त्यातून ज्ञान मिळवले. पुस्तके आणि ग्रंथालये हा मानवतेचा समान वारसा आहेत. एका छोट्या पुस्तकात जगाच्या इतिहासाची दिशा बदलण्याची क्षमता आहे. महात्मा गांधीजींच्या आत्मचरित्राचा संदर्भ देत त्यांनी सांगितले, की जॉन रस्किन यांच्या 'अन टू द लास्ट' या पुस्तकाचा गांधीजींच्या जीवनावर मोठा सकारात्मक प्रभाव पडला आहे. राष्ट्रपती श्रीमती मुर्मू म्हणाल्या की, हस्तलिखितांचे संवर्धन आणि ग्रंथालयांचे आधुनिकीकरण आणि डिजिटलायझेशनसाठी प्रयत्न करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या वापराने ग्रंथालयांचे स्वरूप बदलत आहे. 'वन नेशन- वन डिजिटल लायब्ररी' हे राष्ट्रीय उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नॅशनल व्हर्च्युअल लायब्ररी ऑफ इंडिया विकसित करण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. नॅशनल मिशन ऑन लायब्ररीच्या यशामुळे ग्रंथालयांशी जोडण्याची आणि पुस्तके वाचण्याची संस्कृती बळकट होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. हा महोत्सव 'आझादी का अमृत महोत्सवा'च्या दुसऱ्या टप्प्याचा एक भाग आहे. ग्रंथालयांच्या विकासाला आणि डिजिटलायझेशनला चालना देण्यासाठी आणि वाचन संस्कृती जोपासण्याच्या पंतप्रधानांच्या संकल्पनेशी सुसंगत आहे, असेही त्यांनी सांगितले.

लेखक सत्र, मुलांसाठी कार्यशाळा, मुलांसाठी गॅलरी आणि ग्रंथालयांच्या डिजिटलायझेशनवर गटचर्चा, सत्रांचा समावेश असेल. ज्ञानाचा उत्सव साजरा करणे, इतिहास आणि भविष्यातील अंतर कमी करणे आणि वाचनाची आवड वाढवणे हा या मागचा उद्देश आहे. ग्रंथालय महोत्सव २०२३' या महोत्सवाच्या समारोप समारंभाला उपराष्ट्रपती जगदीप धनखड उपस्थित राहतील. देशातील ग्रंथालयांचे आधुनिकीकरण आणि डिजिटलायझेशन यावर संवाद सुरू करण्यासाठी या महोत्सवात जगभरातील प्रतिष्ठित ग्रंथालयांची ओळखही यावेळी करून देण्यात येणार आहे.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचा विक्रम; वर्षभरात बारा हजारांहून अधिक रुग्णांना १०० कोटी रुपयांच्या मदतीचे वाटप

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून सहाय्यता निधीच्या टीमचे कौतुक

मुंबई : साहेब तुमच्यामुळे मला नवं आयुष्य मिळालंअशा शब्दात नाशिकच्या धर्मा सोनवणे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याजवळ आपली भावना व्यक्त केलीश्री. सोनवणे यांच्याप्रमाणेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत वैद्यकीय सहायता मिळालेल्या राज्यातील सुमारे १२ हजार ५०० रुग्णांची अशीच प्रतिक्रिया असणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत या वर्षभरात १०० कोटी रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली. हा एक अनोखा विक्रम असून त्याबद्दल निधी कक्षाच्या टीमचे कौतुक करतानाच गरजू रुग्णांच्या मदतीसाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा काल समारोप झाला. विधानभवनातील मुख्यमंत्री श्री.शिंदे यांच्या दालनात धर्मा सोनवणे यांना एक लाख रुपयांच्या वैद्यकीय मदतीचा धनादेश मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. हे तेच धर्मा सोनवणे आहेत ज्यांना मुख्यमंत्र्यांनी मदत केली होती. काही दिवसांपूर्वी मुंबईकडून ठाण्याला परतत असताना रस्त्याच्या कडेला एक रुग्णवाहिका उभी असल्याचे मुख्यमंत्र्यांच्या दृष्टीस पडले. त्यांनी ताफा थांबवून रुग्णाची विचारपूस केली..त्याला आपल्या ताफ्यातील रुग्णवाहिका देऊन ठाणे येथील रुग्णालयात दाखल केले होते. मुख्यमंत्र्यांनी तेव्हा श्री. सोनवणे यांना केवळ रुग्णवाहिकाच दिली नव्हती तर ठाण्यातील खाजगी रुग्णालयात उपचारदेखील केले होते. या उपचारांचा खर्च मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून करण्यात आला त्याचाच एक लाखांचा धनादेश काल श्री. सोनवणे यांना देण्यात आला. त्यावेळी मला तुमच्यामुळे नवं आयुष्य मिळाल्याची भावना सोनवणे यांनी मुख्यमंत्र्यांना बोलून दाखवली.

श्री. सोनवणे यांच्या चेहऱ्यावर दिसलेले कृतज्ञतेचे भाव हेच अलौकिक समाधान देऊन गेल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. काल विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देतानादेखील मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी वैद्यकीय मदत कक्षाच्या कामाचे कौतुक केले होते. गरजूंना मदत देताना प्रसंगी सोपस्कार होत राहतील परंतु त्यांना वेळेवर मदत दिली पाहिजे अशी भावना देखील व्यक्त केली होती.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाने गेल्या वर्षभरात १०० कोटींची मदत वितरित करण्याचा टप्पा सर केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी या कक्षाचे कौतुक केले. या कक्षाने केलेले अथक परिश्रम आणि रुग्णसेवेसाठी दाखवलेली तत्परता यामुळे हे



साध्य झाल्याचे सांगत भविष्यातही गरजू रुग्णांना अशाच प्रकारे मदत करण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. या कक्षाचे विशेष कार्य अधिकारी मंगेश चिवटे, निलेश देशमुख यांच्यासह त्यांच्या टीममध्ये काम करणारे सर्व वैद्यकीय सहाय्यक, शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांचे मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले. या कक्षाचा वैद्यकीय मदतीचा आलेख कायम चढता राहिला असून यापूर्वी ५० तर आता १०० कोटी वैद्यकीय मदत देण्याचा टप्पा सर केल्यामुळे राज्यातील गरजू रुग्णासाठी हा निधी कक्ष हा एक आशेचा किरण ठरला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स ॲंड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे कार्य आदर्शवत : पो.महासंचालक कृष्णप्रकाश

अक्कलकोट /प्रतिनिधीः राज्यातील विविध तीर्थक्षेत्रांच्या धरतीवर स्वामी समर्थांचे मूळस्थान असलेल्या अक्कलकोट नगरीतील मूळस्थान वटवृक्ष मंदिर समितीचे उपक्रम भाविकांच्या सोयीचे आहेत. गर्दीमध्ये सर्वोत्कृष्ट सोयी सुविधा देण्यासाठी मंदिर समितीचे नेहमीच सचोटीचे प्रयत्न असतात. त्यात नेहमी उत्कृष्ट सेवा देऊन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिर समिती भाविकांना नेहमीच सर्वोत्तम सोई सुविधा पुरवीत आहे. सर्वोत्तम सोयी सुविधांबरोबरच कमी वेळेत जास्तीत जास्त भाविकांच्या स्वामी दर्शनाचे नियोजन करण्याचे कार्य महेश इंगळे व मंदिर समिती विश्वस्तांनी हाती घेऊन ती यशस्वीपणे राबवित आहे याचे खूप मोठे समाधान वाटते. त्यामुळे श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे कार्य आदर्शवत असल्याचे मनोगत मुंबईचे अप्पर पोलीस महासंचालक कृष्णप्रकाश यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे यांनी अप्पर पोलीस महासंचालक कृष्णप्रकाश यांचा स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी महासंचालक कृष्णप्रकाश बोलत होते. पुढे बोलताना कृष्णप्रकाश यांनी मंदिर समितीचे हे उपक्रम सर्वच स्तरातील स्वामी भक्तांकरिता उपयोगी असून यापुढेही समितीने अशाच पद्धतीने उपक्रम राबवून स्वामी दर्शनाची नेटाने व्यवस्था करीत राहावी याकरिता मंदिर समितीच्या प्रती शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मतराव जाधव, डी.वाय.एस. पी. यामावार साहेब, नॉर्थ




पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी, निरीक्षक पुजारी साहेब, धनराज शिंदे, गजानन शिंदे, शरद चव्हाण, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, विपुल जाधव, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, चंद्रकांत सोनटक्के आदींसह स्वामीभक्त उपस्थित होते.

# पंढरपूरातील तुळशीमाळा कारागीर कामगारांचे प्रश्न शासनदरबारी!

## उपमुख्यमंत्री अजित पवार व कामगारमंत्री सुरेश खाडे यांचेकडून मोठा दिलासा



पंढरपूर/प्रतिनिधीः वारकरी सांप्रदायात अनन्यसाधारण महत्व आहे. पंढरपुरातील जातीवंत पारंपारिक वारसा-परंपरेने या तुळशी माळा बनवणारा काशीकापडी समाज वारकरी सांप्रदायाच्या उगमापासुन ते आजपर्यंत वारकर्यांची मनोभावे सेवा करत आहे. परंतु या समाजाचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. याच प्रश्नांना सोडविण्यासाठी तुळशीमाळा कारागीर कामगार संघाचे शिष्टमंडळ थेट मुंबईत गेले आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व कामगारमंत्री सुरेश खाडे यांची भेट घेऊन त्यांना आपल्या समाजाच्या प्रमुख प्रश्न सोडविण्याबाबतचे निवेदन दिले. काशीकापडी समाजाचे सर्व प्रश्न सोडविण्याचे आश्वासन मंत्री महोदयांनी यावेळी दिलेय. यानिमित्ताने आजतागायत शासनाच्या विविध लाभांपासुन वंचित असणार्या काशीकापडी समाजाला शासन दरबारी न्याय मिळण्याचे संकेत मिळाले आहेत.

काशीकापडी समाजाच्या प्रमुख मागण्या खालीलप्रमाणे आहेत. तुळशीमाळा कामगारांची असंघटीत कामगार म्हणून कामगार महामंडळात नोंदणी करावी, तुळशीमाळा कामगारांना स्वत:चे घर बांधण्यासाठी घरकुल योजनेतून अनुदान मिळावे, सरकारी बँकेतुन तुळशीमाळा कामगारांना विनातारण कर्ज उपलब्ध करुन मिळावे, ५० वर्षांवरील तुळशीमाळा कामगारांना मासीक पेंशन ५ हजार रुपये सुरु करावी, तुळशीमाळा कामगारांना पंढरपूर नगरपरिषदेच्या वतीने समाजभवन बांधण्यासाठी जागा मिळावी, पंढरपूर नगरपरिषदेकडून तुळशीमाळा कामगारांना व्यवसाय करण्यासाठी पथविक्रेता परवाना मिळावा.

अशा आशयाच्या मागणीचे निवेदन यावेळी मंत्री महोदयांना देण्यात आले असुन लवकरात लवकर वरील सर्व प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन शासनाकडून देण्यात आले आहे.

यावेळी तुळशीमाळा कारागीर कामगार शिष्टमंडळातील माजी नगरसेवक रामभाऊ भिंगारे, पंढरपूर काशीकापडी समाज अध्यक्ष औदुंबर गंगेकर, तुळशीमाळा कामगार युवक प्रतिनिधी श्रीनिवास उपळकर, तुळशीमाळा कामगार प्रतिनिधी गणेश भिंगारे, तुळशीमाळा कामगार प्रतिनिधी पांडुरंग वाडेकर, तुळशीमाळा कामगार प्रतिनिधी दत्तात्रय वाडेकर आदी उपस्थित होते.

# भटक्या विमुक्त जाती जमाती लोकांच्या करिता १७ ऑगस्टला मतदान यादीत नावे समाविष्ट करणे व अन्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन

वागदरी/ एस.के.गायकवाड : भटक्या विमुक्त जाती जमातींच्या लोकाकरीता दि.१७ ऑगस्ट २०२३ रोजी नळदुर्ग ता.तुळजापूर येथे मतदान यादीत नावे समाविष्ट करणे, तसेच आधारकार्ड, जातिचे दाखले,रेशन कार्ड सह अन्य सुविधा उपलब्ध करून देणे याकरिता विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबत माहिती असी की भटके विमुक्त जाती जमातीचे जे लोक मतदानापासून वंचित आहेत त्यांचा सर्वे करून विशेष कॅम्प घेऊन मतदार यादी त्यांचा समावेश करण्यात येणार आहे त्याचबरोबर आधार कार्ड ,रेशन कार्ड, जातीचा दाखला व अन्य बाबतीतही त्याना ताबडतोब सुविधा निर्माण करून दिली जाणार आहे.



या संदर्भात उस्मानाबाद जिल्हाधिकारी मा.डॉ. सचिन ओंबासे यांनी एका आदेशान्वये जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना प्रत्येक तालुक्यात अशा प्रकारे विशेष कॅम्प घेण्यासाठी आदेशित केले असून तुळजापूर तालुक्यात या कामासाठी सामाजिक कार्यकर्ते एस.के. गायकवाड वागदरी हे परिवर्तन सामाजिक संस्थेचे प्रतिनिधी म्हणून काम करीत असून आज नळदुर्ग शहरातील खंडोबा रोड येथे राहात असलेले वैदू समाज व मसनजोगी समाज त्यांच्या पालावरती जाऊन त्यांच्या मुलाखती घेतल्या आहेत त्यांची माहिती संकलन केली आहे. अक्कलकोट रोड डी.एड.कॉलेजच्या बाजूला असलेल्या महादेव कोळी मरगम्मा समाजातील लोकांच्या भेटी घेऊन त्यांच्याही अडीअडचणी बाबत माहिती जाणून घेतली ही सर्व माहिती एकत्रित करून नळदुर्ग येथे दिनांक १७ ऑगस्ट रोजी विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात येणार असून यामध्ये या लोकांना सर्व शासकीय सुविधा मिळण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे आपल्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे साहेब साहेब तुळजापूरचे तहसीलदार व त्यांची सर्व यंत्रणा या कामात मदत करणार आहे निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी दोन ऑगस्ट रोजी तउ घेतली होती त्यानुसार उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये परिवर्तन सामाजिक संस्थेचे सचिव मारुती बनसोडे यांच्या पुढाकाराने आठ तालुक्यात त्यांचे प्रतिनिधीची नेमणूक करण्यात आली असून या कामाला सुरुवात झाली आहे.

# स्वाभिमानी लवकरच राज्य शासनाच्या विरोधात आंदोलन करणार

पंढरपूर/प्रतिनिधी : स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रविकांत तुपकर संघटनेतून बाहेर पडण्याची चर्चा होत आहे याबाबत विचारले असता सुट्टी म्हणाली तुपकर व पदाधिकाऱ्यात मध्ये निर्माण झाले आहेत ते मतभेद आठ ऑगस्ट रोजी शिस्तपालन समिती समोर मांडून मिटवण्यात येईल हे पेल्यातील वादळ आहे स्वाभिमानी संघटना ही शेतकऱ्यांची संघटना आहे त्यामुळे या संघटनेत कोणी हायजॅक करू शकत नाही. राजू शेट्टी पंढरपूर दौरावर आले असता पत्रकार शी बोलत होते यावेळी जिल्हाध्यक्ष सचिन पाटील व पदाधिकारी उपस्थित होते



# स्वेरीत 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम' संपन्न

## इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग आणि कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंगचा संयुक्त उपक्रम

पंढरपूर/प्रतिनिधीः गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग आणि कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग या विभागांच्या संयुक्त विद्यमाने 'कन्व्हर्टींग इनोव्हेशन इन टू एन्ट्रप्रेन्युअरशीप अँड स्टार्टअप' या विषयावर दि. २४ जुलै ते दि.२९ जूलै २०२३ दरम्यान एक आठवड्याचा 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम' हा कार्यक्रम संपन्न झाला.




स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आयोजिलेल्या या उपक्रमाचे उद्घाटन पुण्यातील निताल कॉम्प्युटर सिस्टम प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक सुदर्शन नातू यांच्या हस्ते झाले. दीप प्रज्वलनानंतर इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगच्या विभागप्रमुख डॉ. दिप्ती तंबोळी यांनी प्रास्ताविकात हा 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम' आयोजित करण्यामागचा हेतू स्पष्ट केला. यावेळी कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. स्वाती पवार या उपस्थित होत्या. या प्रोग्रामच्या पहिल्या दिवशीच्या पहिल्या सत्रात सुदर्शन नातू यांनी 'इन्टरप्रेनर्स आणि त्यांचा प्रवास' या विषयावर विचार व्यक्त केले. दुसऱ्या सत्रात तुषार मेहता यांनी 'इनोव्हेशन आणि पेटंट' या विषयी माहीती दिली. दुसऱ्या दिवशी स्वेरीचे शैक्षणिक अधिष्ठाता डॉ.प्रशांत पवार यांनी 'नवीन विचारांना चालना कशी द्यावी व त्यांचा आदर कसा करावा' या विषयावर अभ्यासपूर्ण माहिती दिली. प्रोग्रामच्या दुपारच्या सत्रात स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या 'सोबस सेंटर ऑफ एक्सलन्स' चे गिरिश संपथ यांनी 'बिझनेस कॅनव्हास आणि लीन कॅनव्हास विषयी माहिती दिली. इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगच्या विभागप्रमुख डॉ. दिप्ती तंबोळी आणि इनोव्हेशन सेलच्या प्रमुख डॉ.विद्याराणी क्षीरसागर यांनी 'ॲक्टव्हिटी बेस्ड लर्निंग' मधून 'बिजनेस आयडियाज' विषयी माहीती दिली. तिसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात मयांक बॅनर्जी यांनी 'कन्वरटींग इनोव्हेशन इन स्टार्टअप' बद्दल माहिती दिली. दुपारच्या सत्रात डॉ. प्रशांत मंडलके यांनी 'आयडीया टू बिजनेस जर्नी ऑफ ॲन इन्टरप्रेन्युअर' याबाबत माहिती दिली. संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे म्हणाले की, 'अशा फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅममुळे विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यामध्ये संशोधन क्षमतेला अधिक चालना मिळते व स्पर्धात्मक युगात विज्ञान व तंत्रज्ञानात अधिक भर पडते.' अंतिम सत्रात सुहास उलगडे यांनी 'प्रोजेक्ट रिक्वायरमेंट' याबद्दल माहिती दिली. चौथ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात अरकस बापू दिलीप यांनी 'कॉपोरेट ॲण्ड स्ट्रेटेजीक एन्ट्रप्रेन्युअरशीप' याबाबत माहिती दिली. दुपारच्या सत्रात रणजीत शिंदे यांनी 'रोबोटीक प्रोसेस ऑटोमेशन' याबद्दल माहिती सांगितली. चौथ्या दिवशीच्या अंतीम सत्रात अशोक सराफ यांनी 'डीटेल वर्क प्लॅनींग'बद्दल माहिती दिली. पाचव्या दिवशीच्या पहिल्या सत्रात सौ. भावना अंबुडकर यांनी 'नॅशनल इनोव्हेशन अँड एन्ट्रप्रेन्युअरशीप पॉलीसी इंम्लीमेंटेशन' याबद्दल माहिती दिली. दुपारच्या सत्रात अशोक सराफ यांनी 'क्वालिटी मॅनेजमेंट प्लान्स' बद्दल माहिती दिली. आठवडाभर चाललेल्या या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम मध्ये १०० पेक्षा अधिक प्राध्यापकांनी सहभाग घेतला. त्यावेळी सहभागी प्राध्यापकांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

या प्रोग्राम मध्ये अनेक संशोधक, प्राध्यापक व तज्ञांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी व्यासपीठावर स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, सौ.नातू, संशोधन विभागाचे अधिष्ठाता डॉ.अमरजित केने यांच्यासह प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दोन्ही विभागांच्या प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ.एम.पी.ठाकरे व प्रा.पी. डी. माने यांनी काम पाहिले. सुत्रसंचालन प्रा.एस.व्ही. मोहोळकर, प्रा. निमिशा देवल यांनी केले. कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. स्वाती पवार यांनी आठवडाभर चाललेल्या 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम' आपल्याला भविष्यात कशाप्रकारे उपयोगी आहे ? याबद्दल अभ्यासपूर्ण विचार मांडून उपस्थितांचे आभार मानले.

# जगदगुरू पंचाचार्य प्रशालेत समाज कल्याण विभागामार्फत शिष्यवृत्ती विषयी मार्गदर्शन संपन्न

अक्कलकोट/प्रतिनिधीः गौडगाव येथील श्री गुरु सिद्ध मल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगदगुरू पंचाचार्य उच्च माध्यमिक प्रशालेत समाज कल्याण व समान केंद्र यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती विषयी मार्गदर्शन अक्कलकोट समता दूत नालंदा चंदनशिवे यांनी मार्गदर्शन केले.

आपल्या मार्गदर्शन च्या वेळी समाज कल्याण .बार्टी व समान संधी केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती संदर्भात येणाऱ्या अडचणी समान संधी समितीमार्फत सोडवणे समाज कल्याण मार्फत राबविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दिले जाणारा विविध शिष्यवृत्ती विषयी राज्यश्री शाहू महाराज शिष्यवृत्ती तसेच पदवीनंतर बार्टी मार्फत राबविण्यात येणाऱ्या एम पी एस सी यूपीएससी पीएचडी व फेलोशिप या संदर्भात सखोल माहिती देण्यात आले या मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांना नक्की फायदा



होईल यावेळी प्राचार्य कल्याणी देशेट्टी प्रा.वीरेश धनशेट्टी प्रा.श्रीशैल सावळतोट प्रा.लक्ष्मीपुत्र देशेट्टी व बहुसंख्या विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

# पडघा केंद्रात जिजाऊ संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना वह्या वाटप

भिवंडी/मिलिंद जाधव :जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक सस्थेकडून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष निलेश सांबरे व भिवंडी लोकसभा क्षेत्र व महिला सक्षमीकरण ठाणे जिल्हा प्रमुख मोनिका पाणवे यांच्या माध्यमातून शैक्षणिक चळवळ अधिक गतिमान व्हावी विद्यार्थ्यांना मदतीचा हात द्यावा. म्हणून संपूर्ण कोकणामध्ये विद्यार्थांसाठी २५ लाख वह्या वाटप कार्यक्रम सुरू आहे , यांचं अनुषंगाने भिवंडी तालुक्यातील पडघे केंद्रांतील १३ शाळांमध्ये विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आल्या.यावेळी ९१० विद्यार्थांना एकूण २१६८ वह्या वाटप करण्यात आल्या.,यावेळी जिजाऊ सदस्य नवनाथ वाघेरे ,पंकज भोईर,गणेश ठाकरे,मयूर दुबेले,महेश वावरे,निलेश पाटील,ऋषिकेश फर्डे,विशाल शेलार ,सूरज शेलार,कमलेश जाधव, हेमेंद्र पाटील,




रोहिणी पाटील ,मनिषा ठाकरे,दामिनी कोर,जनार्दन ठाकरे,स्वप्नील पाटील उपस्थित होते ,यावेळी सर्व शाळा व्यवस्थापक समितिने जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे आभार मानले.

# श्री गुरुदत्त शुगर्स लि. टाकळीवाडी कडून जिल्हा परिषद शाळा कुमार विद्या मंदिर टाकळीवाडी येथे वही वाटप

पत्रकार नामदेव निर्मळे

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे श्री गुरुदत्त शुगर्स लिमिटेड टाकळीवाडी चे चेअरमन मा.माधवराव घाटगे साहेब व एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर मा. राहुल घाटगे साहेब यांच्या संकल्पनेतून कुमार जिल्हा परिषद शाळा कुमार विद्या मंदिर टाकळीवाडी येथे वही वाटप करण्यात आला

.श्री गुरुदत्त शुगर्स ने नेहमी सामाजिक बांधिलकी जपली आहे. महापूर असो किंवा कोरोना असो संकट काळात नेहमी सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी अग्रेसर आहे. मुलांना प्रोत्साहित करण्यासाठी व शिक्षणासाठी मदतीचा हात मिळावा यासाठी वही वाटप करण्यात आला.१ली ते ७वी एकूण २५५ विद्यार्थी, विद्यार्थ्यांना वही वाटप करण्यात आला. यावेळी श्री गुरुदत्त शुगर्स चे सी. डी. पाटील साहेब ,सिक्युरिटी अधिकारी शामराव पाटील साहेब तसेच शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षिका ,सर्व विद्यार्थी, उपस्थितीत होते.



## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन



पंढरपूर/प्रतिनिधीः सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समितीच्या वतीने प्रांताधिकारी गजानन गुरव यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.यावेळी मंदीर समितीचे तहसिलदार सुशिल बेल्हेकर, नगरपालिका प्रशासन अधिकारी अधिकारी अशिष लोकरे, मुख्याधिकारी अरविंद माळी, मंदीर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड उपस्थित होते.

## लंपी लसीकरण शिबिर गोगांव येथे संपन्न




अक्कलकोट/प्रतिनिधी : गोगांव ता. अक्कलकोट येथे तालुका पशुसंवर्धन विभागाच्या वतीने तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ. दिनेश मुरूमकर यांच्या मार्गदरशनाखाली वागदरी येथील पशुंवर्धन अधिकारी विष्णू कोळेकर व त्याच्या टीमच्या वतीने लंपी लसीकरण व वंदत्व तपासणी शिबिर घेण्यात आले

या शिबिराचे उद्घाटन उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी जेष्ठ सदस्य प्रदीप जगताप, बाबूराव बिराजदार, परमेश्वर गायकवाड, विजयकुमार गायकवाड डॉ. जोगदे, डॉ. समर्थ सलगरे, डॉ. लक्ष्मण काळे बाबुशा पट्टेदार, आकाश गायकवाड, विनोद बनसोडे, विशाल बनसोडे आदी उपस्थित होते, यावेळी १०० जनावराचे लंपी लसीकरण व वंदत्व तपासणी करण्यात आले.

## सुभाष गल्ली येथील हिंदू मुस्लिम एकात्मतेचे प्रतीक असलेले मोहरम उत्साहात साजरा



अक्कलकोट/प्रतिनिधी : सुभाष गल्ली येथील हिंदू मुस्लिम एकात्मतेचे प्रतीक असलेले झुमकेवाले साहेब व नालेहैदर साहेब कवडीपीर यांचा मोहरम आज दि.५ऑगस्ट रोजी अत्यंत उत्साहात पार पडला. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कोणताही गाजावाजा न करता मिरवणुकीचा अनावश्यक खर्च टाळून भाविकांसाठी प्रसादाचा आयोजन केला होता. यामध्ये मोठ्या प्रमाणात भाविकांनी दर्शन घेऊन प्रसादाचा लाभ ही घेतले. हा सर्व आयोजन जे न बॉईज ग्रुप यांनी केला.

या वेळी अल्ताफ ताची, दयानंद बिडवे,राजू थंब, राजशेखर भरडे ,गुरु पट्टदक,पप्पू दसले,मंजुनाथ साखरे,हनु चाबुकस्वार, युसुफ बागलकोट, मुबारक कोरबु, सोहेल फरास, इरफान ताची, मुन्ना ताची रशिद खिस्तके, वाहिद चाबुकस्वार, समीर चाबुकस्वार, मुस्तकीम सायद, अमीन खान, शफील शेख, यासीन फणीपुरे,अकील ताची, इम्रान शेख, अश्रफअली गोलंदाज, आदी उपस्थित होते.

**गोगांव ग्रामपंचायतीने केले उमेश काटे यांच्या हस्ते १०१ झाडाचे वृक्षारोपण**

# आई वडिलांना न सांभाळणाऱ्यांचा वारस नोंद होणार नाही

## सरपंच सौ.वनिता सुरवसे यांचा मासिक सभेत निर्णय






अक्कलकोट/प्रतिनिधी : गोगांव येथे ग्रामपंचायत मासिक सभेत सरपंच सौ वनिता सुरवसे यांच्याकडुन त्याच्या संकल्पनेतून मांडण्यात आलेल्या विषयावर चर्चा करण्यात आले, गावात आई वडिलांना न सांभाळणाऱ्या मुलांच्या वारसासाठी भविष्यात ग्रामपंचायत कडून कुठलाच दाखला व सही देण्यात येणार नाही असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. या ठरावाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

ग्रामपंचायत गोगांव यांच्या वतीने जिल्हा परिषद शाळा पासून ग्रामपंचायत पर्यंत दोन्ही बाजूला सहायक गट विकास अधिकारी उमेश काटे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले, यावेळी सरपंच वनिता सुरवसे, उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, जेष्ठ सदस्य प्रदीप जगताप, केंद्र प्रमुख बा ना चव्हाण, कृषी विस्तार अधिकारी पाटरुट, ग्रामसेवक विक्रम घाटे, ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण बिराजदार, शरणप्पा कलशेट्टी, मुख्याध्यापक दयानंद चोळे, कृषी सहायक सिद्धाराम शिरगापुरे, डॉ लिंगराज नडगेरी आदी उपस्थित होते.

गोगांव ग्रामपंचायतच्या वतीने वृक्षारोपण झाल्यानंतर जिल्हा परिषद शाळेत वृक्षारोपण करण्यात आले व आलेल्या मान्यवरांचे स्वागत करण्यात आले

यावेळी बोलताना उमेश काटे म्हणाले की, गोगांव ग्रामपंचयतीचे कार्य कौतुकास्पद आहे, सरपंच वनिता सुरवसे यांनी आई वडील यांना न सांभाळणाऱ्या मुलांचे भविष्यात वारस नोंदी साठी कुठल्याही प्रकारचे ग्रामपंचायत दाखला न देण्याचे एक इतिहासिक निर्णय घेतले आहे हे कौतुस्पद असून जिल्ह्यातील असा ठराव घेणारी ही पहिली ग्रामपंचयत आहे. सरपंच हे महिला असून देखील गावाच्या विकासासाठी कायम प्रयत्नशिल असतात व ग्रामपंचायतीतर्फे सतत नवीन नवीन उपक्रम राविण्यासाठी प्रयत्नशील असतात माझ्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले एक व्यक्ती एक झाड, एक पद एक झाड अश्याप्रकारे सर्वांनी आपल्या आपल्या सोयीने झाडे लावण्याचे व जागविण्याचा काम केले पाहिजे आज वृक्षारोपण करणे काळाची गरज असून शुद्ध स्वच्छ वातावण निर्मिती साठी झाडे लावणे आवश्यक आहे. मुलांना आपल्या घरासमोर किंवा शेतामध्ये किमान एक तरी झाड लावावे. यावेळी झाडाच्या सुरक्षा साठी गावातील सेवा निवृत्त पोलिस अधिकारी फकिरप्पा बनसोडे, परमेश्वर गायकवाड, डॉ लिंगराज नडगेरी, पोस्ट मास्तर भूषण साठे यांनी सुरक्षा जाळी देण्याचे घोषणा केले

यावेळी अंगणवाडी सेविका भाग्यश्री सोनकवडे, तेजाबाई गुरव, बाळप्पा जावळे, विजयकुमार गायकवाड, फूडलीक वाघमारे, शंकर कारभारी , महादेव चव्हाण ज्योती आलूरे आदी उपस्थित होते.

# अवैध आणि दोन नंबर धंदेवाल्यांना वेळापूरमध्ये कोणाचं आहे अभय वरदान..?

वेळापूर / प्रतिनिधी : माळशिरस तालुक्यामधील लोकांनी निवडून दिलेले जनतेचे लोकप्रतिनिधी आमदार श्री. राम सातपुते यांनी यंदाच्या पावसाळी अधिवेशनात सोलापूर जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध देशी आणि हातभट्टी दारू विक्री संदर्भात लक्षवेधी उपस्थित करत संबंधित मंत्रीमहोदय यांना याबाबत जाब विचारला.


त्यानंतर सोलापूर जिल्ह्यासह माळशिरस तालुक्यात सुध्दा या अवैध धंद्यांवर कारवाई सुरू झाल्याचे चित्र सामान्य लोकांना पाहायला मिळाले होते. परंतु माळशिरस तालुक्यातील वेळापूर पोलीस स्टेशन हद्दीत मात्र बेकायदेशीर देशी व हातभट्टी दारू, मटका, गुटखा, जुगार अड्डे त्याचबरोबर बिअर शॉपच्या नावाखाली सर्रास बेकायदेशीर दारू विकणे असे गंभीर बेकायेशीर प्रकार अगदी कसलीही तमा न बाळगता उघडपणे सुरू आहेत.


वेळापूर पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या सर्वच गावांमधे चौका चौकात, लोकांची उठबस असणाऱ्या ठिकाणी तसेच वेळापूर बस स्थानक परिसरात देशी व हातभट्टी दारू विक्री केली जातेय.

दाखवायला तीन टप्प्या बंद करून मटका पंटर असलेल्या एजटांच्या घरातून मटका घेतला जातोय, सर्रास दुकानांतून गुटखा मावा विकला जातोय, बिअर शॉपच्या नावाखाली दुकानाच्या पाठीमागे मिनी बार चालवले जात आहेत. गावाच्या बाहेर पत्र्याचे शेड उभारून जुगार अड्डे चालवले जात आहेत.

हे सगळ अगदी आंधळ्या व्यक्तीच्या ही नजरेला पडावं असं सुरू आहे तरीसुद्धा








येथील पोलीस प्रशासन मात्र शांतच दिसत आहे. तेरी भी चूप मेरी भी चूप कुणाला काही सांगायचं नाय.. मग हे त्यांना कबूल आहे का? असा प्रश्न सामान्य लोक उपस्थित करताना पाहायला मिळत आहे.

संबंधित बेकायदेशीर प्रकार निदर्शनास आणून देऊन ही याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलं जातं आहे

त्यामुळे आता सोलापूर जिल्हा ग्रामीण पोलीस प्रमुख श्री. शिरीष सरदेशपांडे तसेच अकलूज उपविभागीय पोलिस अधिकारी सई भोरे पाटील यांनी तात्काळ लक्ष घालून योग्य ती कडक कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी जनतेमधून केली जात आहे.

## मुख्यमंत्री जनकल्याण कक्षाचे पथक 'शासन आपल्या दारी' साठी जेजुरी येथे दाखल

पुणे : जेजुरी येथे सोमवार ७ ऑगस्ट रोजी आयोजित 'शासन आपल्या दारी' या कार्यक्रमाच्या जागेची मुख्यमंत्री जनकल्याण कक्षातर्फे पाहणी करण्यात आली. कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख यांच्या उपस्थितीत संबंधित विभागप्रमुखांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीस मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव व मुख्यमंत्री जनकल्याण कक्षाचे राज्य मुख्य समन्वयक डॉ. अमोल शिंदे, मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी व मुख्यमंत्री जनकल्याण कक्षाचे सह राज्य मुख्य समन्वयक अमित हुक्केरीकर, अपर जिल्हाधिकारी अजय मोरे व इतर अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.

श्री.शिंदे यांनी कार्यक्रमाबाबत मार्गदर्शन केले आणि सर्वांनी परस्पर सहकार्याने कार्यक्रम यशस्वी करावा असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या ठिकाणी मुख्यमंत्री जनकल्याण कक्षातर्फे नागरिकांची निवेदने स्वीकारण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमासाठी येणाऱ्या लाभार्थ्यांसाठी पुरेशा प्रमाणात पिण्याचे पाणी, आरोग्य व स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

## महसूल सप्ताह अंतर्गत सैनिक हो तुमच्यासाठी हा उपक्रम

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडून शहीद किसन माने यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन

पंढरपूर/प्रतिनिधीः जिल्ह्यात महसूल सप्ताह अंतर्गत सैनिक हो तुमच्यासाठी हा उपक्रम सुरू आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील सर्व स्वातंत्र्य सैनिकांचा सन्मान तसेच अडचणी सोडविण्यात येत आहेत. याच अनुषंगाने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे स्वतः मंगळवेढा तालुक्यातील येड्राव येथील शहीद किसन माने यांच्या निवासस्थानी गेले व तिथे त्यांनी शहीद माने यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, प्रांताधिकारी आप्पासाहेब समिंदर, तहसीलदार मदन जाधव, निवासी नायब तहसीलदार चंद्रकांत हेडगिरे, मंडल अधिकारी शामला कुंभार, तलाठी सारिका कोंढारे यांची उपस्थिती होती.

शहीद माने यांच्या निवासस्थानी सुशांत माने, सचिन माने यांचे व त्यांच्या पत्नी तसेच त्यांची छोटी मुले या सर्वांचा सन्मान जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केला. प्रांताधिकारी समींदर यांनी ही शहीद कुटुंबाचा तालुक्याच्या वतीने सत्कार केला.




स्मारक स्वतःच्या शेतामध्ये आणि ते झाडाच्या खाली सावलीमध्ये असल्याने जिल्हाधिकाऱ्यांना हे स्थळ आवडले. शहीद किसन माने हे कारगिल युध्दानंतर एका मिशनवर असताना झालेल्या अपघातात ते शहीद झाले. त्याची सर्व माहिती सुशांत माने यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिली.

जिल्हाधिकारी आशिर्वाद यांनी माने कुटुंबीयांशी मनमोकळेपणाने संवाद साधला. स्वतः जिल्हाधिकारी आपल्या निवासस्थानी आल्याने माने कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव दिसून येत होते.

महसूल सप्ताह अंतर्गत सोलापूर जिल्ह्यामध्ये विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महसूल प्रशासन घरोघरी जाऊन लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देत आहे.

## देशाच्या सक्षमीकरणासाठी तरुणांनी योगदान देण्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचे आवाहन

मुंबई : भारताला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अशी समृद्ध परंपरा लाभली आहे. देशाला विकसित करून आत्मनिर्भर करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी प्रयत्नशील आहेत. त्यांच्या या कार्यात तरुणांनी सहकार्य करीत देशाच्या सक्षमीकरणासाठी आपले योगदान द्यावे, असे आवाहन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.




एचएसएनसी विद्यापीठ, मुंबई, राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास विभागातर्फे किशीनचंद्र चेल्लाराम महाविद्यालयातील (के. सी. महाविद्यालय) सभागृहात आज सकाळी 'जी २० युवा संवाद-भारत २०४७' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्याचे उद्घाटन मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी एच. एस. एन. सी. विद्यापीठाचे प्र. कुलपती डॉ. निरंजन हिरानंदानी, विश्वस्त माया साहनी, कुलगुरू डॉ. हेमलता बागला, प्रमुख वक्ते प्राचार्य डॉ. संजय चाकणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य समन्वयक डॉ. रामेश्वर कोठावळे, एच. एस. एन. सी. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. भगवान बलानी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. कोलते आदी उपस्थित होते.मंत्री श्री. पाटील म्हणाले की, भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. सन २०४७ मध्ये भारतीय स्वातंत्र्याला १०० वर्ष पूर्ण होतील. येत्या २५ वर्षांत भारताला विकसित राष्ट्र म्हणून घडविण्याचे स्वप्न प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पाहिले आहे. त्यासाठी त्यांनी स्टॅण्डअप, स्टार्टअपसारखे उपक्रम सुरू करीत उद्योजकांना प्रोत्साहन दिले आहे. त्यातून रोजगार निर्मितीबरोबरच भारताची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल सुरू आहे. विकसित राष्ट्रांनी संशोधन, पेटंट आणि स्वामित्व धनावर (रॉयल्टी) भर दिला आहे. तरुणांनीही संशोधन कार्यावर भर दिला पाहिजे. विकसित राष्ट्रांच्या जी- २० या संघटनेचे अध्यक्षपद भारताकडे आले आहे. या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात राज्यातील मुंबईसह पुणे, नागपूर आणि औरंगाबाद या शहरातही कार्यक्रम झाल्याचे मंत्री श्री. पाटील यांनी सांगितले.डॉ. हिरानंदानी यांनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजना हे जगातील दुसऱ्या क्रमांकाचे स्वयंसेवकांचे संघटन आहे. या संघटनेच्या माध्यमातून ग्रामविकासाची कामे केली जातात. अशाच लहान- लहान कार्यक्रमातून परिवर्तन घडून येते. देशात पायाभूत सोयीसुविधांच्या विकास होत आहे. तसेच नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण रोजगारक्षम मनुष्यबळाच्या निर्मितीसाठी पूरक आहे. त्यामुळे आगामी काळात देशात बदल घडून येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कुलगुरू डॉ. बागला यांनी विद्यापीठ आणि जी २० परिषदेच्या निमित्त होणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली. यावेळी विविध महाविद्यालयांचे प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.